# राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या नेतृत्वाचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा. दत्ता जाधव**

**सहाय्यक प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग**

**विवेकानंद कॉलेज ,कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

**सारांश**

*कोल्हापूर संस्थांनची राजवट ही सुमारे इसवी सन १७०७ ते इसवी सन १७४९ अशी सुमारे २४२ वर्षांची होती; तर बडोदा संस्थांनची राजवट ही सुमारे इसवी सन १७२१ ते इसवी सन १७४९ अशी सुमारे २२८ वर्षांची होती. तत्कालीन ब्रिटिश भारतात या दोन संस्थानांनी राजेशाही शासनपद्धती असताना देखील लोकाभिमुख राज्यकारभार केला; म्हणून ही दोन्ही मराठा संस्थांने भारताच्या इतिहासात अजरामर ठरली.*

**संज्ञा :** सामाजिक न्याय,सामाजिक लोकशाही,मराठा राज्य,सामाजिक सलोखा,लोकाभिमुख राज्यकारभार.

**प्रस्तावना**

भारतात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सुमारे ५६५ संस्थाने होती.बडोदा आणि कोल्हापूर संस्थाने ही यापैकीच दोन संस्थांने होत.कोल्हापूर संस्थान इसवी सन १७०७ ला अस्तित्वात आले. कोल्हापूर संस्थान हे ब्रिटिश भारतातील मुंबई इलाख्यातील डेक्कन स्टेटस एजन्सीतील एक संस्थांन होते. कोल्हापूर संस्थान हे तत्कालीन मराठा संस्थानातील एक प्रमुख संस्थान होते.कोल्हापूर संस्थानाचा पहिला राजा शिवाजी शहाजी (द्वितीय) होय. भारत स्वतंत्र झाल्यानंतर इसवी सन १९४९ ला महाराजा छत्रपती शहाजी (द्वितीय) यांनी हे संस्थान भारतात विलीन केले. कोल्हापूर संस्थान हे मराठा संस्थांन होते. येथे भोसले घराण्याची राजवट होती. बडोदा संस्थान हे ब्रिटिश भारतातील मुंबई इलाकेतील एक महत्त्वाचे संस्थान होते.१६ व्या व १७ व्या शतकामध्ये मुघल साम्राज्याच्या अधिपत्याखाली राहिल्यानंतर अखेर इसवी सन १७२१ साली येथून मुघलांना उसकावून लावण्यात मराठ्यांना यश आले. १७२१ साली येथे गायकवाड घराण्याने बडोदा संस्थान स्थापन केले. ब्रिटिश राजवटी दरम्यान देखील बडोदा संस्थानाला स्वायत्त दर्जा होता. बडोदा संस्थानचे संस्थांनिक गायकवाड हे मराठा घराणे होते. या संस्थानाचा पहिला राजा पिलाजीराव गायकवाड तर शेवटचा राजा फत्तेसिंहराव गायकवाड हे होते. कोल्हापूर संस्थांनची राजवट ही सुमारे इसवी सन १७०७ ते इसवी सन १७४९ अशी सुमारे २४२ वर्षांची होती; तर बडोदा संस्थांची राजवट ही सुमारे इसवी सन १७२१ ते इसवी सन १७४९ अशी सुमारे २२८ वर्षांची होती. तत्कालीन ब्रिटिश भारतात या दोन संस्थानांनी राजेशाही शासनपद्धती असताना देखील लोकाभिमुख राज्यकारभार केला; म्हणून ही दोन्ही मराठा संस्थांने भारताच्या इतिहासात अजरामर ठरली.प्रस्तुत संशोधनात संशोधकांने दोन्ही मराठा संस्थानांचा राज्यकारभार लोकाभिमुख करणारी प्रजाहित दक्ष राजे राजर्षी शाहू महाराज(चौथे) व महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांच्या नेतृत्वाचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधन केवळ इतिहासाची मांडणी ठरणार नाही, तर वर्तमान राज्यसंस्थेला लोकाभिमुख राज्यकारभार कशा पद्धतीने करावयाचा याचे मार्गदर्शन ठरेल. त्याचबरोबर लोकशाहीत नेतृत्वाची जडणघडण कशा पद्धतीने व्हायला हवी?याचेही मार्गदर्शन आत्ताच्या राज्यकर्त्यांना मिळेल. इतिहास म्हणजे त्या त्या कालखंडातील त्या त्या लोकांच्या आणि नेतृत्वाचा सामाजिक, सांस्कृतिक ,धार्मिक, राजकीय आणि आर्थिक विचारांचे आशा -आकांक्षांचे घडामोडींचे आणि स्थितींचे प्रतिबिंब असतो. त्या घटनांचे - घडामोडींचे आणि विचार प्रवाहांचे ते प्रकारचे अविष्करन असत प्रत्येक करण आणि विवेचन म्हणजे अर्थनिर्पणही असते कोणतेही राष्ट्र आणि समाज आपला इतिहास बाजूला ठेवून उभे राहू शकत नाही इतिहासही मानवी समाजाचे एक अखंड , अभंग आणि अविभाज्य असे छायाचित्र असते. जे छायाचित्र पाहून त्या समाजाला भविष्यकालीन मार्गक्रमण करता येते.

**उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधनाची साठीची संशोधन संशोधना संशोधकांसमोर पुढील उद्दिष्टे आहेत

१. कोल्हापूर आणि बडोदा संस्थानाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२. राजर्षी शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या नेतृत्वाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३ . तत्कालीन सामाजिक सुधरणांचा तुलनात्मक अभ्यास करणे पाच मराठा राज्यसंस्था शब्दबद्ध करणे.

## राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य आणि विचार

**समाजिक सुधारणा**

रशियन विचारवंत प्लेकनोव्ह असे म्हणतो, 'महापुरुषांच्या जागी असे काही गुण असतात, की ते आपल्या काळातील मोठ्या सामाजिक गरजा पुरवण्यासाठी समर्थ ठरतात; तसेच ते इतरांपेक्षा अधिक पुढचे पाहू शकतात व त्या बाबतीत त्यांची कळकळ इतरांपेक्षा अधिक तीव्र असते.' नि:संशयपणे शाहू महाराज आपल्या समकालीनांपेक्षा पुढचे पाहू शकले. पहिली सामाजिक सुधारणा म्हणजे आपल्या संस्थानातील नोकऱ्यांमध्ये मागासलेल्या जातीजमातीच्या लोकांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय २६ जुलै १९०२मध्ये घेऊन तो अंमलात आणण्यास सुरुवात केली. राखीव जागांचे धोरण अंमलात आणणारे शाहू महाराज हे पहिले राज्यकर्ते ठरले. १८९९च्या सुमारास करोनाप्रमाणेच प्लेगच्या साथीने कोल्हापूर संस्थानात हाहा:कार उडाला होता. मात्र, महाराजांनी अविरत कष्ट घेऊन उपाययोजना केल्या व परिस्थिती आटोक्यात आणली. वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांनी धर्मसुधारणेच्या चळवळीस गती दिली. स्वामी दयानंद, केशवचंद्र आणि गुड जोतीराव फुले यांच्या थोर कार्याची त्यांनी स्तुती केली. ब्राह्मो समाज, आर्य समाज व सत्यशोधक समाज या संस्था समाजाला धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करीत आहेत असे त्यांचे मत होते. सामाजिक सुधारणेचा उद्देश सार्वजनिक नीतिमत्तेत वाढ करणे हा आहे. धर्माच्या नावाने जे पुरोहितशाहीचे बंड माजले होते, विषमता निर्माण झाली होती; भोळेपणा, अनाचार व भ्रष्टाचार वाढला होता, त्यास महाराजांनी विरोध केला. स्वामी दयानंद, केशवचंद्र व जोतीराव फुले यांनी नवीन विचारांच्या प्रचारास सुरुवात केली. महाराजांच्या मते जोतीरावांनी ब्राह्मणांच्या धार्मिक वर्चस्वावर हल्ला केला. त्यांचे धार्मिक स्थान हे त्यांचे मर्मस्थान. जोतीरावांच्या सत्यशोधक समाजाचे मत ईश्वर व भक्त यात दलाल नको हे होते; तर वेदाचा अधिकार सर्व मनुष्यमात्रास आहे, सर्व मानव जात समान आहे; समाजात बनावटी व लोकांना लुटून खाणारा धर्म नको, असे स्वामी दयानंदांनी सांगितले होते. धर्म म्हणजे भटाची दक्षिणा हा अर्थ मतलबी असून अशी दक्षिणा बुडाल्यानेच देशाचे रक्षण होईल, असे महाराजांचे सांगणे होते(चौसाळकर अशोक,२००७:४८७).

**शैक्षणिक कार्य**

महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे सूत्र राजर्षी शाहू यांनी पकडले. आपल्या संस्थानातील प्रजेसाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे, या विषयावर शाहू महाराज १९१३पासून गांभीर्याने विचार करत होते.२५ जुलै १९१७ रोजी राजर्षी शाहू महाराज यांनी फोफाट आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आदेश जारी केला. पुढे त्यांनी २१ सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या शिक्षणाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला.४ मार्च १९१८ रोजी करवीर मधील चिखली या गावात गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर फोफाट आणि सक्तीच्या पहिल्या प्राथमिक शाळेचा शुभारंभ केला(भगत रा. तू.२००७: ६०४) केवळ शाळा काढून भागणार नाही, तर पालकांनी मुलांना शाळेत पाठवले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. यासाठी मुलांना न पाठविणाऱ्यांवर दंड आकारला. मुलींच्या शिक्षणासाठी शाहू महाराज विशेष आग्रही होते. देशाच्या स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू आहे; तरीही मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे १०० टक्के यश अजूनही दूर आहे. या पार्श्वभूमीवर महाराजांचे कार्य काळाच्या कितीतरी पुढे होते, असे म्हणावे लागेल.

**कृषी कार्य**

कोल्हापूर संस्थानातील ९० टक्के जनतेची उपजिवीका शेतीवर अवलंबून होती. औद्यागिक विकासाची गती कृषी क्षेत्राच्या विकासाखेरीज वाढणे अशक्य आहे. त्यामुळे शाहू महाराजांनी शेती विकासाला अग्रक्रम दिला. त्यासाठी त्यांनी १९०२ मध्ये इटली सारख्या कृषीप्रधान देशाला भेट दिली. तेथील कृषी धोरणाचे सुक्ष्म निरिक्षण केले. या निरिक्षणावरुन त्यांच्या लक्षात आले की, प्रगत देशाच्या तुलनेत आपल्या देशातील कृषीची उत्पादकता कमी आहे. कृषीची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतीचे आधुनिकीकरण करणे आणि शिती व्यवसायाला प्रतिष्ठा मिळवून देणे हाच कृषी विकासाचा पाया आहे. अशी शाहू महाराजांची खात्री होती.शाहू महाराजांनी कृषी विकासासाठी कृषी धोरण, कृषी विकासासाठी सिंचन सुविधा, धरणे, सुधारीत बि-बियाणे, अवजारे, प्रदर्शने, आधुनिक पिके, तुकडेबंदी इत्यादी उपाय योजना केल्या. त्यामुळे कृषी विकासाला चालना मिळाली. राजर्षी शाहू महाराजांनी कृषी विकासासाठी केलेले प्रयत्नातून राष्ट्र विकासाला एक नवीन दिशा दिली.ज्या उद्देशाने त्यांनी हा प्रकल्प जिद्दीने सुरू केला, नेटाने पुढे नेला, त्याची फळे कोल्हापूर जिल्ह्याला, त्यातील प्रजेला, वर्षानुवर्षे मिळत आहेत. भोगावती नदीचे पाणी वर्षानुवर्षे राधानगरी धरणातून वाहातच आहे, भोवतालच्या प्रदेशाला संपन्न बनवत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात, ऐतिहासिक काळात बांधले गेलेले गड, किल्ले, प्राचीन वास्तू, मोठी धरणे ही जर बोलती झाली तर त्यांची प्रत्येकाची कहाणी अशीच बोधप्रद ठरणार आहे. महाराजांनी अशाच एका प्रकल्पाचा पाया रचला आणि इमारत विस्तारतच गेली. कोल्हापूर जिल्ह्याला हरितक्रांतीचे, सहकाराचे फायदे मिळत गेले, मिळत जातील. राधानगरी धरण प्रकल्प हे एक आदर्श उदाहरण म्हणून अजूनही अनुकरणीय आहे. अशा त-हेच्या प्रकल्पांचे जाळे देशभर विणले गेल्यास आर्थिक विकासाला वेग प्राप्त होण्यास मदत होईल (कुलकर्णी मिना ,२००७:७००).

**कला क्रीडा सांस्कृतिक कार्य**

राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. स्वातंत्र्योत्तर काळात भालजी पेंढारकर व मा. विनायक यांच्या मागून तात्या अंबपकर, बाळ गजबर, वसंतराव पेंटर (आनंदराव पेंटरचे पुत्र), माधवराव शिंदे, दिनकर द. पाटील, अनंत माने प्रभृतींनी मराठी चित्रपटसृष्टीची परंपरा श्रीमंत केली. अभिनेत्यांमध्ये चंद्रकांत, सूर्यकांत, अरूण सरनाईक, रमेश देव तर अभिनेत्रींमध्ये सुलोचना, लीलाताई पेंढारकर, बेबी नंदा, आशा काळे, पद्मा चव्हाण आदी कोल्हापूरच्या कलावंतांनी मराठी चित्रपटसृष्टीची सेवा बजावली आहे. मा. विठ्ठल, व्ही. शांताराम यासारख्या कलावंतांनी कोल्हापूरचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचविले आहे. याच कोल्हापुरात प्रसिद्ध नाटककार विष्णुपंत औंधकर यांच्या नाट्यप्रतिभेस, थोर कविवर्य ग. दि. माडगुळकर यांच्या काव्यप्रतिभेस व ख्यातनाम गायक सुधीर फडके यांच्या गानप्रतिभेस पहिले घुमारे फुटले आहेत. एवढेच नव्हे तर आज स्वरसम्राज्ञी म्हणून ज्यांची कीर्ती त्रिखंडांत पसरलेली आहे, त्या लता मंगेशकर यांच्या कलावंत कारकीर्दीचा प्रारंभही याच भूमीतील आहे(पवार जयसिंगराव,२००७:२२६).

## महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य आणि विचार

**समाजिक सुधारणा**

सयाजीरावांची राजकीय कारकीर्द सुरू झाली तेव्हाचा भारतीय समाज हा आधुनिक ज्ञान- विज्ञानापासून दूर असल्याने कर्मकांडात आणि अंधश्रद्धामूलक समजुतीमुळे गतिशून्य झालेला होता. जातिप्रथेमुळे दुभंगलेला होता. वर्णजातिलिंगभेदात्मक समाजरचनेमुळे निर्माण झालेली विषमता, स्पृश्यास्पृश्यभावामुळे होणारी मानखंडना व निम्नवर्गीयांची मानवी हक्काची पायमल्ली हे सयाजीरावांच्या चिंतेचे विषय होते. आपल्या प्रजेची पारंपरिक रूठी दास्याच्या जोखडातून सुटका करणे आणि तिला आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या विवेकनिष्ठ जाणिवांनी सुज्ञ बनवणे हा राजकर्तव्याचाच भाग आहे, असे ते मानीत. समाजातील जातीय-धार्मिक दुही मिटविणे, लोकांना उद्यमशील आणि विवेकनिष्ठ बनविणे ही त्यांच्या राजकीय कारकिर्दीची मुख्य उद्देशपत्रिका होती. "जे राष्ट्र गरीब वर्गाचा तिरस्कार करते, त्यांना सामाजिक दर्जा वाढविण्याची संधी देत नाही, ते राष्ट्र आपले घर वाळूच्या पायावर बांधते अशी

महाराजांची धारणा होती." (कलकता, १९०६) १९०४ साली १८ व्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे उद्घाटन करताना आपल्या भाषणातून महाराजांनी जातिसंस्थेतील घातक प्रथांची चर्चा केली आहे. जातिसंस्थांच्या अर्थशून्य असलेल्या कर्मठ नियमांनी मानवी आयुष्य जखडले गेले आहे. कुटुंबसंस्था, वैवाहिक जीवन, शिक्षण अशा सर्वच क्षेत्रांवर हे जातिसंस्थेचे सावट आहे. जातीनुसार व्यवसाय निश्चित होत असल्याने माणसाच्या कर्तृत्वाचा परीघ संकुचित झाला आहे. व्यवसायबदल करता येत नाही, परदेशगमन करून पाश्चात्त्यविद्या शिकता येत नाहीत, जातीजातीत सुसंवाद नाही. जात स्थानिक द्वेष वाढविते, देशात दुही माजविते, बुद्धीची वाढ खुंटविते, राष्ट्रीय शक्तीचा ऱ्हास घडवून आणते. या दुःस्थितीवर मात करण्यासाठी सर्व जातीत रोटीबेटीव्यवहार सुरू करावेत व कटू भेदाभेद नष्ट करावेत, असे महाराजांनी आवाहन केले होते. (मुंबई, ३० डिसेंबर १९०४)

**शैक्षणिक कार्य**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा सर्वांत जिव्हाळ्याचा विषय शिक्षण हाच होता. भारतातले खिस्तपूर्व सातव्या शतकातले तक्षशिला विद्यापीठ, त्यानंतर चारशे वर्षांनी स्थापन झालेले सम्राट अशोकाच्या कारकिर्दीतील पाटलीपुत्र विद्यापीठ, खिस्तोत्तर सातव्या शतकातले नालंदा विद्यापीठ, यांचा नमुनादर्श त्यांच्यापुढे होता. या विद्यापीठांतून वर्ण, जाती, पंथ याकडे न पाहाता सर्व वर्गातील विद्यार्थी एकाच गुरूकडे राहून शिक्षण घेत. मात्र आठव्या शतकानंतर नवद्वीप, काशीपुरी येथे जातिनिष्ठ विद्यापीठे स्थापन झाल्याने ही व्यापक शिक्षणव्यवस्था खंडित झाली. बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. विद्येची ही मक्तेदारीच आजच्या अवनत स्थितीला कारणीभूत झाली, हे महाराजांच्या लक्षात आले होते. त्यामुळे पुन्हा एकदा आपल्या राज्यात मुक्तीद्वार शिक्षणपद्धतीचा प्रयोग नेटाने करण्याचा संकल्प केला. (काशी, १९ जानेवारी १९२४) महाराजांनी ऑक्सफर्ड, केंब्रिज, पॅरिस, बर्लिन, व्हिएना येथील प्राचीन विद्यालये स्वतः जाऊन पाहिली. जगभरातल्या उत्तमोत्तम शिक्षणसंस्थांना भेटी दिल्या. देशाचे उज्ज्वल भवितव्य घडविणाऱ्या शिक्षणपद्धती आणि सोयीसुविधा आपल्या राज्यात निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**कृषी कार्य**

'फिजिओर्केट' पंथातील अर्थशास्त्रज्ञांच्या मते शेतीतूनच राष्ट्रीय संपत्ती निर्माण होत असते. 'मर्कान्टालिस्ट' पंथियांच्या मते देशांतर्गत व देशाबाहेरील व्यापारातून संपत्ती निर्माण होत असते. तर 'क्लासिकल' अर्थशास्त्रज्ञांच्या मते श्रमाने मूल्याची निर्मिती होत असते. सयाजीराव गायकवाड यांनी हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेसंबंधी विचार करताना अर्थशास्त्रातील या तिन्ही पंथांच्या समन्वयातून एक सर्वसमावेशक भूमिका घेतली आहे. हिंदुस्थानात ७५% लोक शेतीवर निर्वाह करीत असल्यामुळे आपल्याकडे शेती महत्त्वाचीच आहे, याविषयी दुमत असण्याचे कारण नाही. परंतु ही शेती परिस्थितीशरण असून बेभरवशाची आहे. इथली शेती लहान लहान तुकड्यांची, निरनिराळ्या ठिकाणी विभागलेली आहे. इथल्या शेतकऱ्यांकडे शेतीचे साहित्य व जनावरे यांचीही कमतरता आहे. अमेरिका अथवा जर्मनीतील शेतकऱ्यांकडे शेती करण्याचे जे शास्त्रीय ज्ञान आहे, त्याचा अभाव भारतीय शेतकऱ्यांमध्ये आहे. साहजिकच भारतीय शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी असून ते सतत कर्जबाजारी असतात. हे लक्षात घेऊन महाराजांनी आपल्या राज्यात शेतकऱ्यांना ट्रॅक्टर इत्यादी आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यावर भर दिला. शेती सुधारण्याच्या उपक्रमांची व्यवहार्यता वाढविण्यासाठी फिरत्या तपासनिसांची नेमणूक केली. जनावरांचे पशुवैद्यक दवाखाने काढलेत. दूध डेअरी व्यवस्थापनाच्या माहितीचा प्रसार केला. धनंजयराव गाडगीळ यांनीही उत्तरकाळात शेतीच्या अर्थकारणाच्या संदर्भात सयाजीराव गायकवाड यांच्यासारखाच विचार मांडलेला दिसतो." यावरून महाराजांच्या द्रष्ट्या अर्थनीतीचा मुद्दा अधोरेखित होतो( वरखेडे रमेश,२०१७ :४६). पूर्वीच्या काळी शेतकऱ्यांकडून मिळणारा शेतसारा हेच राज्याचे मुख्य उत्पन्न होते. शेतसारा हाच राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत असल्याने वसुलीसाठी अधिकाऱ्यांकडून जबरदस्ती होत असे. वसुलीचे ठरावीक आणि पारदर्शी धोरण नसल्यानेही बऱ्याच वेळा शेतकऱ्यांची फसगत होत असे. सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्याच्या दुसऱ्याच वर्षी शेती सुधारणेसाठी 'सर्व्हे-सेटलमेंट' नावाचे नवीन खाते निर्माण केले. त्यामार्फत त्यांनी शेतीसंबंधित सुधारणांचा धडाका सुरू केला. पूर्वीच्या शेतसारा पद्धतीत आमूलाग्र बदल केले. एका शेतातून मागील वर्षी किती उत्पन्न आले ते प्रथम पाहिले, नंतर मागील अनेक वर्षांत त्या शेतामधून किती उत्पन्न आले हेही ठरवले. तसेच पुढील अनेक

वर्षांत किती उत्पन्न येईल हेही अंदाजे ठरवले. जमिनीच्या उत्पन्नात वाढ झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारचा कर वाढवायचा नाही, हा नियम घालून दिला. महाराजांनी शेतीचे उत्पन्न ठरवताना शेतकऱ्याची मजुरी, ते पीक काढण्यापर्यंत अवजारांसाठी लागणारा खर्च आणि याची जमवाजमव करताना शेतकऱ्यांनी कर्ज घेतले तर त्याचे व्याजही खर्चात घ्यावे आणि त्यानंतर जे उत्पन्न शिल्लक राहील त्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक रक्कम कर रूपात घ्यावयाची नाही, असा नियम केला. याचा अर्थ शेतसारा देताना शेतकऱ्यांचे पीक तयार होईपर्यंतचा खर्च विचारात घेतला. अशा प्रकारे शेतसारा ठरवण्याची सोपी आणि सर्वसमावेशक पद्धत सुरू केली.

**कला क्रीडा सांस्कृतिक कार्य**

मॅकियावलीच्या 'द प्रिन्सेस' अर्थात राजधर्म या बीजग्रंथाचा फार मोठा प्रभाव त्यांच्या राजनीतीत दिसून येतो. मॅकियावलीने जी राजकर्तव्ये सांगितली होती त्यात कला-क्रीडांना उत्तेजन देण्याचे महत्त्व आधोरेखित केले होते. " सयाजीरावांनी हा राजधर्म तंतोतंत पाळला. त्यांनी राजा रविवर्मा यांच्या चित्रकलेला प्रोत्साहन दिले. बडोद्यात त्यांना स्टुडिओ काढून दिला, चित्रप्रदर्शनांना प्रोत्साहन दिले. निरनिराळ्या संगीतकारांच्या संगीतसभांचे आयोजन केले. क्रीडा आणि खेळांना उत्तेजन दिले. स्वतंत्र व्यायामशाळा काढल्या. चिंतामणराव वैद्यांसारख्या प्राच्यविद्या संशोधकास वर्षासन, महात्मा फुले यांना ग्रंथप्रकाशनार्थ अनुदान, अशा विविध योजना व उपक्रमांद्वारे नवविचारप्रवर्तन आणि अभिरुचिसंवर्धनास पाठबळ दिले. कला आणि विज्ञानातल्या प्रयोगशील अभिव्यक्ती करणाऱ्यांचे स्वागत करून, तसेच बुद्धिवादी आणि स्वतंत्र विचाराच्या लोकांच्या व संस्थांच्या माध्यमातून शांततामय, आनंदी व सुसंवादी समाजाची निर्मिती करण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. निरनिराळ्या संस्कृतीत नांदणाऱ्या कला-कल्पना, सामाजिक संस्थात्मक व्यवस्था, प्रशासनिक नमुनादर्श आणि जीवनशैलीचा आदर करून जे जे चांगले, अनुकरणीय ते ते आपल्या राज्यात आणून रुजवण्याचा प्रयत्न केला. या मधुमक्षिका वृत्तीतून त्यांनी सातत्याने नवविचारांचे स्वागत केले आणि कुठल्याही एकच एक संप्रदायाचे वा विचारसरणीचे कर्मठ अनुयायी बनण्यापासून स्वतःला वाचविले(वरखेडे रमेश,२०१७:१०३) .

**राजर्षी शाहू महाराज आणि महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याची तुलना**

राजर्षी शाहू महाराज आणि महाराज सयाजीराव गायकवाड हे दोन्ही प्रजा हित दक्ष राजे मराठा होते. ते समकालीन होते मराठा समाज हा उदारमतवादी समाज आहे हे प्रथमतः छत्रपती शिवरायांनी दाखवून दिले. ही सुधारमतवादी परंपरा कोल्हापूर संस्थांनचे राजे राजर्षी शाहू महाराज आणि बडोदा संस्थांचे राजे महाराजा सयाजीराव गायकवाड या दोन्ही मराठा राजांनी अखंड राखली. राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थांचे अधिपति. राजर्षी शाहूंना केवळ ४८ वर्षांचे जीवन लाभले. वयाच्या दहाव्या वर्षी ते कोल्हापूर संस्थांचे राजे झाले. अवघी ३८ वर्षांची राजकीय कारकीर्द राजर्षी शाहू महाराज यांच्या वाट्याला आली. छोट्या कारकीर्दीमध्ये राजर्षी शाहूंनी हिमालया एवढे उत्तुंग लोककल्याणाचे काम केले. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजयज्ञ काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इसवी सन १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगवेगळ्या शाळा भरविण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आप आपल्या राज्यात आंतरजातीय व्यवहाला मान्यता देणारा कायदा केला इसवी सन १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णय प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इसवी सन १९१६ साली निप्पाणी येथे डेक्कन रयत असोसिएशन ही संस्था स्थापन केली. शाहू छत्रपती स्पिनिंग अँड हीलिंग मिल, शाहूपुरी व्यापार पेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट इत्यादी संस्था कोल्हापूरचा स्थापन्यात त्यांचा मोठा वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे अशा उपक्रमातून त्यांनी कृषी विकासाचे लक्ष लक्ष पुरविले मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली स्वातंत्रपूर्वक कैक वर्ष आधी समता बंधुता धर्मनिरपेक्षता स्वातंत्र्य ही लोकशाही मानवी म्हणले राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात अमलात आणली.

बडोद्याचे सयाजीराव गायकवाड हे देखील राजर्षी शाहूंच्या प्रमाणे उदारमतवादी मराठा राजे होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांना ७६

वर्षांच्या आयुष्यमान लाभले. राजर्षी शाहूंच्या पेक्षा त्यांना सुमारे २८ वर्षे अधिकचे जीवनमान लाभले; ते जीवन त्यांनी सार्थकी लावले. महाराजा सयाजीराव गायकवाड हे देखील राजर्षी शाहूंच्या प्रमाणे सुधारकी पुरोगामी विचारांचे मराठा राजे होते. २८ सप्टेंबर १८८१ रोजी गादीवर आल्याबरोबर त्यांनी राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना केल्या. प्रशासकीय जबाबदारीची विभागणी केली हे तत्त्व राज्यकारभारात लागू करून राज्य यंत्रणेत त्यांनी सुरळीतपणा निर्माण केला. कल्याणकारी योजना अमलात आणल्या(१८८३). न्यायव्यवस्थेत सुधारणा केल्या, ग्रामपंचायतीचे पुनर्जीवन केले (१९०४) , सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना सुरू करून (१८९३) अल्पावधीतच ती लागू करणारे बडोदा हे देशातील पहिले संस्थान ठरले. गरीब गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणाची सोय केली. औद्योगिक कलाशिक्षणाकरिता कलाभवन ही संस्था स्थापन केली. त्यांनी प्राची विद्यामंदिर या संस्थेच्या वतीने प्राचीन संस्कृत ग्रंथाचे संशोधन व प्रकाशन करण्यास उत्तेजन दिले. त्यांनी गावोगावी फिरत्या वाचनालयांची सुरुवात केली. पडदा पद्धती बदली. बालविवाह बंदी कन्या विक्री रुंदी मिश्र विवाहाचा पुरस्कार स्त्रियांना वारसा हक्क मिळवून देणे अस्पृश्य अस्पृश्यता निवारण विरभाव इत्यादी सुधारणा प्रत्यक्षात अमलात आणल्या घटस्फोटासंबंधीचा कायदा हा सर्व भारतात पहिल्यांदाच त्यांनी जारी केला महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याकडे दृष्टिपणे होते. प्रस्तुत संशोधनात या दोन महान, उदारमतवादी मराठा राज्यांच्या नेतृत्वाचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे A Leder who knows the plus of society. ज्या नेत्याला समाजाची नस कळते तो खरा नेता. ही नेतृत्वाची व्याख्या या दोन्ही दृष्ट्या राज्यांना चक्कल पणे लागू पडते. अलीकडच्या काळात भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे उलटून उलटूनही देशाला समस्यांना सामोरे जावे लागत आहे प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न, जातीय दंगली, सन्मानार्थ हत्या, कृषी औद्योगिक समस्या आधी समस्यांच्यावर मात करावयाची असेल तर राजर्षी शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य आणि नेतृत्वच आपल्याला व सरकारला सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक योजना आखण्यात सहाय्यभूत ठरेल.

**निष्कर्ष**

१. राजर्षी शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी राजेशाहीत सामाजिक लोकशाहीचा प्रयोग केला. कोल्हापूर संस्थान आणि बडोदा संस्थान त्या सामाजिक लोकशाहीच्या प्रयोगाच्या प्रयोगशाळा होत्या.

२. राजर्षी शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी 'मराठा राज्य' विकसित केले.

३. राजर्षी शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे मराठा राज्य 'स्वायत्त' आणि 'प्रवाही' होते.

४. राजर्षी शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या राजेशाहीला शहाणपण आणि माया होती.

५. राजर्षी शाहू महाराजआणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी राजेशाहीत जबाबदार शासन पद्धतीला सुरुवात केली हा लोकशाही राजयसंस्थेविषयी लोकशाही आयाम विकसित केला.

६. राजर्षी शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांची सामाजिक न्यायाची दृष्टी जॉन रॉल्स या विचारवंताच्या न्याय कल्पनेशी सुसंगत आहे.

**संदर्भ:**

१. वरखेडे रमेश(२०१७)महाराजा सयाजीराव गायकवाड भाषणसंग्रह भाग १ ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई.
२. वरखेडे रमेश(२०१७)महाराजा सयाजीराव गायकवाड भाषणसंग्रह भाग २ ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई.
३. वरखेडे रमेश(२०१७)महाराजा सयाजीराव गायकवाड भाषणसंग्रह भाग ३,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई.
४. वरखेडे रमेश(२०१७)महाराजा सयाजीराव गायकवाड भाषणसंग्रह भाग ४ ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई.
५. वरखेडे रमेश(२०१७)महाराजा सयाजीराव गायकवाड भाषणसंग्रह भाग५ ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई.
६. जाधव रमेश(२०२३)शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक : एक शोध,अक्षर दालन प्रकाशन,कोल्हापूर.
७. जाधव रमेश(२०१६)राजर्षी शाहू गौरव ग्रंथ,मराठी भाषा संचाळणाय,मराठी विभाग,महाराष्ट्र शासन.